# <u>शिक्षिकेची नोंद</u>

जेव्हा मी माझ्या विद्‍यार्थ्यांना गटांमध्ये प्रयोग करायला देते, तेव्हा सगळे जण छान मिळून मिसळून काम करतात. पण जेव्हा मी नीता, आशू आणि मानसीला प्रयोग करायला दिला, तेव्हा मला शंका वाटलीच. “आज भडका उडणार; आणि बहुतेक तो ज्वालामुखीचा नसणार.”

या मुली काही मैत्रिणी नव्हत्या. पण मी सगळ्यांना मिळून मिसळून काम करायला शिकवते. इतर सगळ्या गटांनी कामाला सुरुवात केली. थोडा वेळ माझे या मुलींकडे लक्षच गेले नाही. पण नंतर बघते ते काय, एक उदास, एक रागावलेली तर एक रडवेली. अरे देवा!

जेव्हा मी त्यांच्या जवळ गेले, सगळ्या एकदमच बोलायला लागल्या.

नीताला ज्वालामुखीच्या त्या चिकट पदार्थाला हातच लावायचा नव्हता. आशूच्या डोक्यात कल्पना होत्या, पण ती त्या इतरांना समजावून सांगू शकत नव्हती. मानसीला वाटत होते की आता बोलणे बंद करून कामाला सुरुवात करायला पाहिजे.

मी आधी मुलींना शांत केलं. त्यांना सांगितले की त्यांचे ज्या गोष्टींवर एकमत आहे, त्यांची यादी करा. त्यांचे एकमत झाले की त्या पीठ, पाणी आणि मीठ वापरून एक ज्वालामुखी करत होत्या. पण त्यानंतर मात्र कशावरच एकमत होत नव्हते.

ज्वालामुखी केवढा करायचा? पीठ कोणी कालवायचे? पाणी किती घालायचं? प्रत्येकीच्या आपल्या कल्पना होत्या. आणि त्यांना दुसरीचं ऐकायचं नव्हतं.

जेवणाची सुट्टी झाली. या गटाचं काम मात्र काहीच झालं नव्हतं. मला वाटायला लागलं की यांना एकत्र करून मी काही चूक तर नाही केली? या गटाला एकत्र काम करताच येणार नाही का?

१. आशूचा स्वभाव कसा आहे, आणि मानसीचा स्वभाव कसा आहे? तुमचा स्वभाव कोणासारखा आहे? का?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२. शिक्षिकेची चूक झाली का? का?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३. वाक्यात उपयोग करा: मिळून मिसळून, भडका उडणे, उदास, रडवेली, कल्पना, एकमत, ज्वालामुखी

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

<u>विद्यार्थ्याची नोंद</u>

(जेवणाच्या सुट्टीनंतर मुलींनी पुन्हा काम करायला सुरुवात केली. नंतर काय झाले त्याची एका मुलीनी केलेली नोंद...)




-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------